वाचले :

१. श्री.तुषार तुकाराम काळभोर पदनाम - मेटनन्स हेल्पर विभाग ब क्षेत्रीय कार्यालय यांचा घरदुरुस्ती अग्रिम मिळणेबाबत दिनांक १४/०८/२०२४ चा विनंती अर्ज.

२. क्षेत्रीय अधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक. बक्षेका/वि/१/कावि/८४४/२०२४ दि.२६/०८/२०२४ अन्वये घरदुरस्ती अग्रीम मिळणेकामी केलेली शिफारस.

३. कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग यांनी पत्र क्र.स्था/मुख्य/कावि/०४/७१/२०२४, दि.११/१२/२०२४ यांचा घरदुरुस्ती बांधकाम अहवाल

४. मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३९७३ दि.२७/०८/२०२४

५. मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ७०६, दिनांक १०/०९/२०२४

६. प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. साप्रवि/१६/कावि/१८९/२०२४, दिनांक ११/१०/२०२४

७. मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक प्रशा/१/कावि/११७५/२०१३, दि. २९/०८/२०१३ अन्वये प्रशासकीय स्वरुपाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले असून घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार सहा.आयुक्त (प्रशासन) यांना प्रदान करण्यात आले आहेत.

८. श्री.तुषार तुकाराम काळभोर यांनी सादर केलेले मे.काळभोर ॲन्ड चव्हाण डेव्हलपर्स यांचेकडील दि.२६/६/२०२४ रोजीचे कोटेशन.

९. सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक.-१९/१२/२०२४ चा मंजूर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
क्र. साप्रवि/१६/कावि/२१४/२०२४
दिनांक :-१९/१२/२०२४

विषय :- श्री.तुषार तुकाराम काळभोर, मेटनन्स हेल्पर विभाग ब क्षेत्रीय कार्यालय यांचे घरदुरुस्ती अग्रिम मंजुरीबाबत.(संगणक क्र.९६७९)

आदेश,

श्री.तुषार तुकाराम काळभोर यांना मौजे चिखली येथील गट नं १२४५/२ येथील मे.मयुर डेव्हलपर्स यांचेकडील मयुर इनक्लेव्ह या गृहयोजनेमधील पहिल्या मजल्यावरील ५७२ चौरस फुटाचा फ्लॅट क्रमांक १०२ खरेदी करण्यासाठी आदेश क्रमांक प्रशा/१५/कावि/३७१/२०१६ दि.०३/०७/२०१५ अन्वये र.रु. १६,५२,०००/- इतके इतके घरबांधणी अग्रिम मंजूर करुन अदा करणेत आले आहे. तथापि श्री.तुषार तुकाराम काळभोर यांनी वाचले क्र १ चे अर्जान्वये सदरचे फलॅटमध्ये स्थापत्य विषयक दुरुस्ती करणेकामी घरदुरस्ती अग्रीम मिळणेकामी विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच सदरचे अर्जासोबत घरदुरुस्ती अग्रीम मंजुरीकामी आवश्यक सर्व कागदपत्रांची पुर्तता केली आहे.

श्री.तुषार तुकाराम काळभोर यांचे दिनांक १४/०८/२०२४ च्या घरुदुरुस्ती अग्रिम र.रु. १४,०४,४०३/- मिळणे संदर्भातील अर्जाचे अनुषंगाने मा.क्षेत्रीय अधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय यांनी वाचले क्र २ अन्वये घरदुरस्ती अग्रीम मंजूर करणेस स्पष्ट शिफारस केली आहे.तसेच खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसलेबाबतचा अहवाल सादर केला आहे.

वाचले क्रमांक ४ व ५ अन्वये महापालिका आस्थापनेवरील कर्मचारी व अधिकारी यांना मूळ वेतनाचे ५० पट मिळून येणारी रक्कम परंतु कमाल मर्यादा रक्कम रु. १५,००,०००/- विहित मर्यादेपर्यंत मागील अटी व शर्तीस अधीन राहून फ्लॅट दुरुस्तीस अग्रिम मंजूर करण्यास मान्यता दिली आहे. तसे मा. आयुक्त यांच्याकडील वाचले क्रमांक ६ चे परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळविण्यात आले आहे. वाचले क्रमांक ६ च्या परिपत्रकातील अ.क्र.ड नुसार घरदुरुस्ती अग्रिम मंजूर करणेबाबत धोरण निश्चीत करणेत आले आहे. तसेच वाचले क्रमांक ७ अन्वये सहाय्यक आयुक्त, प्रशासन यांना घरदुरुस्ती अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार प्रदान केले आहेत.

श्री.तुषार तुकाराम काळभोर यांच्या घरदुरुस्ती कर्जाबाबत मा.कार्यकारी अभियंता , स्थापत्य विभाग यांनी वाचले क्र ३ अन्वये कोटेशनमधील नमूद केलेल्या दुरुस्ती विचारात घेऊन, र.रु. ८,५३,०५०/- अदा करण्याबाबत शिफारस केली आहे. दिनांक २७/१०/९८ च्या परिपत्रकातील अट क्र. ६

मधील तपशिलानुसार व कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग यांचेकडील अहवालानुसार खालील नमुद केलेप्रमाणे घरदुरुस्तीस अग्रिम अनुज्ञेय आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | कोटेशननुसार घरदुरुस्तीचा खर्च र.रु. | कार्यकारी अभियंता यांचे अहवाला नुसार दुरुस्तीचा खर्च र.रु. | मनपा नियम व धोरणानुसार पूर्णांकित रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | स्लॅबची दुरुस्ती | ९६,६००/- | -- | -- |
| २. | भिंतींची दुरुस्ती | ३,८५,१६३/- | २,३१,०००/- | २,३१,०००/- |
| 3. | भिंतींना प्लॅस्टर करणे | २,१७,०००/- | १,३०,०००/- | १,३०,०००/- |
| ४. | दरवाजे दुरुस्त करणे | ११,७७५/- | ११,७७५/- | ११,७७५/- |
| ५. | खिडक्या दुरुस्त करणे | ४२,१७५/- | ४२,१७५/- | ४२,१७५/- |
| ६. | किचनओटा दुरुस्ती | ३९,६००/- | ३९,६००/- | ३९,६००/- |
| ७. | टाईल्स दुरुस्ती | ५,३३,५९०/- | ३,२०,०००/- | ३,२०,०००/- |
| ८. | ड्रेनेज लाईन/टॉयलेट दुरुस्ती व सॅनेटरी वर्क | ३५,०००/- | ३५,०००/- | ३५,०००/- |
| ९. | इतर दुरुस्ती | ४३,५००/- | ४३,५००/- | -- |
| | एकूण | १४,०४,४०३/- | ८,५३,०५०/- | ८,०९,५५०/- |

परिपत्रक क्रमांक साप्रवि/१६/कावि/१८९/२०२४, दिनांक ११/१०/२०२४ अन्वये आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाकडील घरदुरुस्ती कर्जाबाबत निश्चीत धोरणानुसार, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या अहवालानुसार व मनपा चे धोरणास अनुसरून प्रथम हप्त्यापोटी ५० टक्के रक्कम आणि उर्वरित रक्कम काम पुर्ण झाल्यानंतर अदा करणे आवश्यक आहे.

श्री.तुषार तुकाराम काळभोर यांचा माहे जुलै- २०२४ च्या वेतनाच्या दाखल्यानुसार मूळवेतन र.रु. ३३,७०० /- इतका मिळतो. त्यांचा एकूण पगार र.रु ६३,३६०/-इतका आहे. यांचे मुळ वेतनाच्या ५० पट प्रमाणे परतफेडीची क्षमता व पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६ मधील कलम ७(३)(२) नुसार खालील प्रमाणे एकूण रकमा येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) मुळ वेतनाच्या ५० पट | मुळपगार रु. ३३,७००/- | ५० पट | १६,८५,०००/- |
| २)घरदुरस्ती कमाल मर्यादा | १५ लक्ष | - | १५ लक्ष |
| ३)घर दुरुस्ती खर्च | मे.काळभोर ॲन्ड चव्हाण डेव्हलपर्स यांचे कोटेशन नुसार १०,२९,५७४/- | - | १४,०४,४०३/- |
| ४)स्थापत्य विभागाकडील अहवालानुसार खर्च | ८,५३,०५०/- | - | ८,५३,०५०/- |
| ५) मनपा धोरणानुसार | | - | ८,०९,५५०/- |

घरदुरुस्ती कोटेशन मधील कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग यांचे दिनांक. ११/१२/२०२४ चे घरदुरुस्ती अहवालामधील रक्कम व वर नमुद केलेली रक्कम यापैकी कमी असलेली उक्त क्र ४ मध्ये नमूद र.रु. ८,०९,५५०/-घरदुरुस्ती अग्रीमापोटी मंजूर करणे आवश्यक आहे.

श्री.तुषार तुकाराम काळभोर यांची महापालिका आस्थापनेवरील एकूण १६ वर्षे ०९ महिने सेवा पूर्ण झाली असून, शिल्लक सेवा १४ वर्षे १० महिने महिने सेवा कालावधी शिल्लक आहे.

सबब, **श्री.तुषार तुकाराम काळभोर** यांनी **मे.काळभोर ऍन्ड चव्हाण डेव्हलपर्स** यांचेकडील सादर केलेले कोटेशन, संबंधित विभागप्रमुख यांची घरदुरुस्ती अग्रिम मंजूर करणेकामी केलेली शिफारस, कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग यांचा घरदुरुस्ती अहवाल या बाबी विचारात घेता **श्री.तुषार तुकाराम काळभोर** यांना रक्कम रु. ८,०९,५५०/- (अक्षरी र.रु **आठ लाख नऊ हजार पाचशे पन्नास** फक्त ) घरदुरुस्ती अग्रिम मंजूर करुन परिपत्रकात नमूद केलेप्रमाणे ५०% प्रथम हप्त्यापोटी रक्कम रु. ४,०४,७७५/- (अक्षरी र.रु **चार लाख चार हजार सातशे पंचाहात्तर** फक्त) अदा करण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

1. सदरचे अग्रिम घेणेपूर्वी **नोंदणीकृत इक्विटेबल मॉर्गेज** ( नोटीस ऑफ इंटीमेशन रिगार्डींग मॉर्गेज बाय डिपॉझिट ऑफ टायटल डीड) करुन द्यावे लागेल. माहे जाने-२०२५ चे वेतन प्रमाणपत्र तसेच घरदुरुस्ती अग्रिम रकमे रकमेच्या पहिल्या हप्त्याची रक्कम संबधितास अदा केलेची मुळ पावती बांधकाम खर्चाची बिले सादर करावीत.
2. **श्री.तुषार तुकाराम काळभोर** यांचेकडून घरदुरुस्ती अग्रिम रकमेची वसूली माहे जानेवारी २०२५ पासुन दरमहा दरमहा र.रु. ११,२००/- प्रमाणे १ ते ७१ हप्ते व शेवटचा ७२ वा हप्ता र.रु.१४,३५०/- याप्रमाणे केली जाईल. तसेच मुद्दलाची संपूर्ण वसुली झाल्यानंतर संपूर्ण अग्रिम रकमेवरील व्याजाची एकूण समान २४ हप्त्यात वसूली केली जाईल.
3. श्री.काळभोर यांनी त्यांचे फलॅटवर घरदुरुस्ती अग्रीम रकमेचा बोजा संबधित करसंकलन कार्यालयाकडून स्वत: नोद करुन घेणे आवश्यक आहे.
4. घरदुरुस्ती अग्रिम मंजुरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रिमाची वसुली पुर्ण झाल्यानंतर या दोन्ही बाबीची नोंद सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.
5. घरदुरुस्ती अग्रिम रकमेच्या नियमित व योग्य वसूलीसाठी अर्जदार स्वत: जबाबदार राहील.
6. अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला,अन्य विभाग/कार्यालयात बदली झाली तरीही घरदुरुस्ती अग्रिम तसेच मनपाकडील इतर अन्य अग्रिमाची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वत जबाबदार राहील.
7. घरदुरुस्ती अग्रिम रकमेवर शासन वित्त विभागाच्या सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातील घरबांधणी कर्जासाठी लागू केलेल्या व्याजदरानुसार व्याजाची आकारणी करण्यात येईल. मात्र त्यामध्ये महानगरपालिका धोरणानुसार वेळोवेळी होणारे बदल बंधनकारक राहतील.
8. मनपा अधिकारी/कर्मचा-यांना मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे त्या कारणाकरीता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यास कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसूरदाराकडून अग्रिमाची रक्कम,प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याजासह एकरकमी वसूल करण्यात यावी.
9. घरदुरुस्ती अग्रिम **श्री.तुषार तुकाराम काळभोर** यांच्या सेवाकालावधीमध्ये एकदाच मंजूर केले जाईल. यानंतर घरदुरुस्ती अग्रिम अनुज्ञेय असणार नाही.

१०. सदर रक्कम **मे.काळभोर ऍन्ड चव्हाण डेव्हलपर्स** यांचे नावे ECS ने जमा करण्यात यावी.

सही/-
( किरणकुमार मोरे )
सहाय्यक आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति,

श्री.तुषार तुकाराम काळभोर पदनाम मेटनन्स हेल्पर, ब क्षेत्रीय कार्यालय

प्रत :-

१. लेखा विभाग

२. संबंधित शाखाधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय

२/ प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकात घेऊन बिल लेखा शाखेकडे सादर करण्याकामी अग्रेषीत.

२/ श्री.तुषार तुकाराम काळभोर .याचे नावे मौजे चिखली विभागीय कार्यालयाकडील करआकारणी रजिस्टरला घरदुरुस्ती अग्रिम रक्कम रुपये ८,०९,५५०/- च्या कर्जबोजाची नोंद घेण्यात येवून तसा मिळकतकर उतारा या विभागास पाठविणेत यावा.

३. सामान्य प्रशासन विभाग.- संगणक कक्ष

( गोरखनाथ लिमण )
प्रशासन अधिकारी
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.